# भारतीय वृत्तपत्राचा इतिहास

**हर्षवर्धन सु. भुसारी** संशोधक विद्यार्थी शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्था, अमरावती

---

**वृत्तपत्राची सुरूवात :-**देशविदेशातील बातम्या देण्यासोबतच वृत्तपत्रांचे महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे सरकारी धोरण जनतेपर्यंत पोहोचविणे याउलट सरकारी धोरणाच्या सामान्य जनतेवर झालेल्या प्रतिक्रया सरकारपर्यंत पोहोचविणे. काळानुसार वृत्तपत्राच्या कार्याचा विकास होत गेला.भारतीय वृत्तपत्राच्या इतिहासाचा आरंभ युरोपीय आगमनासोबत झाला. सर्वप्रथम पोर्तुगीजांनी भारतात छापखाना आणून १५५७ मध्ये गोव्याच्या ख्रिश्चन धर्म प्रचारकांनी पहिले पुस्तक छापले. १६८४ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने मुंबई येथे छापखाना सुरू केला. पण जवळपास १०० वर्ष कंपनीच्या प्रदेशात कोणतेही वृत्तपत्र निघाले नाही. कारण त्या माध्यमाव्दारे आपला खाजगी व्यापार व भ्रष्टाचार लंडनपर्यंत जाईल अशी भिती कंपनी कर्मचाऱ्यांना होती. ईस्ट इंडिया कंपनीच्या कर्मचाऱ्यांमध्ये असलेला भ्रष्टाचार उघड करण्यासाठी असंतुष्ट कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी भारतात वृत्तपत्र सुरू करण्याचा प्रयत्न केला. भारतात पहिले वृत्तपत्र सुरू करण्याचा मान जेम्स ऑगस्टस हिक्की ह्यांना जातो. त्यांनी १७८० मध्ये "The Bengal Gazette" किंवा "The Calcutta General Advertiser" नावाचे वृत्तपत्र प्रकाशित केले. पण त्यानेच सरकारी अधिकारी, मुख्य न्यायाधीश व गव्हर्नर जनरल यांच्यावर टिका केल्याने १७८२ मध्ये त्याचा छापखाना जप्त केल्या गेला. नंतर १७८४ मध्ये "Culcutta Gazette" १७८५ मध्ये 'Bengal Journal' व 'The Oriental Magazine of Culcutta' व १७८६ मध्ये 'Culcutta Cronical' तसेच १७८८ मध्ये 'Madras Courier' अशी अनेक वृत्तपत्रे निघणे सुरू झाले. हिक्की चे उदाहरण समोर ठेवून त्या वृत्तपत्र संपादकांनी सरकारी अधिकाऱ्यांशी संघर्ष टाळला.वृत्तपत्राच्या माध्यमातून युरोपीय व अँग्लोइंडियनांचे मनोरंजन हा त्यावेळी उद्देश होता. त्यामुळे जनमत भडकण्याची भिती नव्हती. वृत्तपत्राबाबत कुठलाही कायदा नसल्याने वृत्तपत्राचे अस्तित्त्व पूर्णता कंपनी अधिकाऱ्यांवर अवलंबून होते.

**वृत्तपत्र पूर्व तपासणी कायदा (१७९९):-**इंग्लंडबाबत कुठलीही दुर्बलता वृत्तपत्रामार्फत समोर येऊ नये असे लॉर्ड वेलस्लीला वाटत होते. त्या भितीतून त्याने वृत्तपत्रावर पूर्व तपासणीचे बंधन घातले. १७९९ च्या कायद्याव्दारे वृत्तपत्रावर युद्धकालीन तपासणी लावण्यात आल. त्यात खालील बाबींचा समावेश होता.

१. वृत्तपत्राच्या प्रत्येक अंकावर 'संपादक' (Editor), मुद्रक (Printer) व मालकाचे नाव असावे.

२. प्रकाशकाने (Publisher) प्रकाशित करावयाच्या गोष्टी सरकारी सचिवाकडे पूर्व तपासणीस पाठवाव्या.

वरील बाबींचा भंग करणाऱ्यास तत्काळ हद्दपार करण्याची शिक्षा होती. नंतर लॉर्ड हेस्टींग्जने या नियमात उदारता दाखवत १८१८ मध्ये वृत्तपत्रांवरील पूर्व तपासणीचे बंधन काढले. पण सरकारने वृत्तपत्राच्या संपादकासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे तयार केली. सरकारी अधिकारांना व जनहितांना वृत्तपत्राव्दारे धक्का पोहोचू नये हा त्यामागचा उद्देश होता.

**परवाना नियम १८२३ :-**१८२३ मध्ये जॉन ॲडम्स् ला कार्यकारी गव्हर्नर जनरली संधी मिळाल्याने आपल्या प्रतिगामी विचारांना अंमलात आणण्याच्या दृष्टीने त्याने भारतातील आजपर्यंतचे कठोर लागू केले ते पुढीलप्रमाणे-

१. मुद्रक व प्रकाशकाला छापखाना काढण्यासाठी परवाना (Licence) घ्यावा लागेल.

२. बिगर परवाना (Withoud Licence) कुठलेही साहित्य छापल्यास वा प्रकाशित केल्यास ४००/- रूपये दंड वा त्याऐवजी कारावासाची शिक्षा बिगर परवाना छापखाना जप्त करण्याचे अधिकार दंडाधिकाऱ्यांना देण्यात आले.

३. गव्हर्नर जनरला कोणताही परवाना रद्द करण्याचा अथवा त्यावर विनंती अर्ज मागविण्याचा अधिकार होता.

जॉन ॲडम्स्चे नियम पाहिल्यास स्पष्ट होतो की, त्याचा भर भारतीय भाषांमधून प्रकाशित होणाऱ्या वा भारतीयाव्दारा प्रकाशित केल्या जाणाऱ्या वृत्तपत्राकडे होता. परिणामी राजा राममोहन रॉयचे 'मिरात-उल-अखबार' बंद पडले. ॲडम्स्च्या वरील आदेशानंतर कलकत्त्याला केवळ तीन बंगाली व एक फारशी वृत्तपत्र छापल्या जात होते.

**भारतीय वृत्तपत्रांना स्वातंत्र्य (१८३५):-**विल्यम बेटींग्सने वृत्तपत्राबाबत लवचीक धोरण ठेवले. मात्र १८२३ चे नियम रद्द करून भारतीय वृत्तपत्रांचा 'मुक्तीदाता' संबोधित करण्याचा मान गव्हर्नर जनरल चॉर्ल्स मेटकॉफ याला जातो. उदारवादी मेकॉलेनेसुद्धा वृत्तपत्र स्वातंत्र्याचे समर्थन केले. मेकॉलेचे मत होते की, संकटकाळात सरकारजवळ असिमीत सत्ता असल्याने शांततेच्या काळात असे कठोर नियम बनविण्याची गरज नाही. नव्या नियमानुसार मुद्रांक व प्रकाशकाला केवळ जागेची माहिती घ्यावयाची होती व नंतर ते आपले कार्य करू शकत होते. हा कायदा १८५६ पर्यंत अस्तित्त्वात होता. या काळात देशातील वृत्तपत्रांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली.

**परवाना कायदा (१८५७) :-**१८५७ च्या उठावाने निर्माण झालेल्या संकटाचा सामना करण्यासाठी १८५७ च्या अधिनियम १५ नुसार पुन्हा परवाना पद्धती लागू करण्यात आली. त्याअन्वये विनापरवाना छापखाना ठेवणे व त्याचा उपयोग करणे यावर बंधन घालण्यात आले व कोणत्याही वेळी परवाना देण्याचा वा रद्द करण्याचा अधिकार सरकारला मिळाला. सरकारला कुठलेही वृत्तपत्र, पुस्तक किंवा इतर मुद्रित साहित्य यांचे प्रकाशन व प्रचलन थांबविण्याचा अधिकार होता. ही व्यवस्था केवळ संकटकालीन होती व तिची मुदत एक वर्ष होती.

**पंजीकरण कायदा (१८६७) :-**१८६७ च्या वृत्तपत्र आणि पुस्तके पंजीकरण कायदा २५ नुसार मेटकॉफचा १८३५ च्या कायद्यात परिवर्तन करण्यात आले. या कायदाचा उद्देश वृत्तपत्रांवर व छापखान्यावर बंधने घालण्याचा नव्हता तर त्याच्यावर नियंत्रण ठेवण्याचा होता. प्रत्येक छापलेल्या वृत्तपत्रावर व पुस्तकावर मुद्रक, प्रकाशक व मुद्रण स्थळाचे नाव देणे आवश्यक होते. याव्यतिरिक्त एक महिन्याच्या आत एक पुस्ताकची प्रत विनामूल्य स्थानिक शासनाकडे घ्यायची होती. हा कायदा १८९०, १९१४, १९५२ आणि १९५३ मध्ये संशोधित करण्यात आला. १९६८-७० मध्ये वहाबी आंदोलनामुळे सरकारने राजद्रोही नेत्यांचा सामना करण्यासाठी प्रतिबंध कायद्याव्दारा भारतीय दंडसंहितेच्या कलम १२४(अ) जोडले. त्यामुळे राजद्रोहाची भावना निर्माण करणाऱ्यास आजीवन हद्दपार किंवा कमी काळासाठी हद्दपारी किंवा दंड अशी तरतूद केल्या गेली.

**भारतीय भाषा वृत्तपत्रे (१८७८)** (The Vernacular Press ACt)**:-**१८५७ च्या उठावामुळे शासक आणि शासीत यांच्या तेढ निर्माण झाल्यामुळे इंग्रजी वृत्तपत्रांनी निरंतर सरकारचे समर्थन केले. १८५७ नंतर भारतीय भाषांमधून वृत्तपत्रांची संख्या प्रचंड वाढली. तसेच ही वृत्तपत्रे सरकारवर टिका करीत असे. लिटनच्या साम्राज्यवादी धोरणाविरूद्ध सार्वजनिक भावना निर्माण झाली. १८७६-७८ मध्ये दुष्काळात जवळपास ५० लक्ष लोक मृत्यूमुखी पडले व त्याचवेळी जानेवारी १८७७ च्या दिल्ली दरबारवर प्रचंड पैसा खर्च करण्यात आला. या बातम्यांमुळे जनतेमध्ये असंतोष निर्माण झाला. लिटनच्या मते, 'त्याचे कारण मेकॉले व मेटकॉफचे वृत्तपत्रविषयक उदारतेचे धोरण होते. म्हणूनच त्याने वृत्तपत्राविरूद्ध शस्त्र उगारले. १८७८ च्या देशी भाषा वृत्तपत्र कायद्याव्दारे सरकारने भारतीय भाषांमधून निघणाऱ्या वृत्तपत्रांवर अधिक नियंत्रण लादण्याचा प्रयत्न केला.

१८७८ च्या कायद्यानुसार सरकारला खालील अधिकार मिळाले.

१. जिल्हा दंडाधिकाऱ्यांना अधिकार देण्यात आला की, त्यांनी भारतीय भाषांच्या वृत्तपत्रांकडून प्रतिज्ञापत्र (Bond) घ्यावे की ज्यामुळे सरकारविरोधी भावना भडकेल किंवा प्रजेत परस्परप भावना निर्माण होईल असे साहित्य प्रकाशित करू नये.

२. दंडाधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम असेल व त्यावर अपिल करता येणार नाही.

३. देशी भाषेतील एखाद्या वृत्तपत्राला कायद्याच्या कार्यवाहीपासून वाचायचे असेल तर त्याने आपले प्रसिद्धपूर्व लिखाण (Proof) सरकारकडे तपासण्यास पाठवावे.

'स्वातंत्र्यावर घाला' असे या कायद्याला म्हणावे लागेल. या कायद्याचा महत्त्वाचा दोष इंग्रजी भाषेतील वृत्तपत्रे आणि भारतीय भाषेतील वृत्तपत्रे यांच्यात केलेला भेदभाव होय. तसेच या कायद्याचा महत्त्वाचा दोष अपील न करण्याची तरतुद होय. या कायद्याअंतर्गत सोमप्रकाश, भारत मिहीर, ढाका प्रकाश, सहचर आणि अनेक वृत्तपत्रांविरूद्ध कारवाई करण्यात आली. आपल्या उद्दिष्टाबाबत कायद्याला यश मिळाले. कारण भारतीय वृत्तपत्रांची भाषा तसेच लिखणामध्ये उदारता आली. सामान्यतः या वृत्तपत्रांमध्ये इंग्रजी वृत्तपत्रातील उल्लेख छापले जावू लागले. बंगाली वृत्तपत्र, अमृत बाजार पत्रिकेने मात्र एका युक्तीचा अवलंब केला. या वृत्तपत्राने रातोरात आपली भाषा बंगाली बदलून इंग्रजी केली व लिटनवरील आपली टिका सुरूच ठेवली. अर्थात वृत्तपत्राची भाषा अर्थात इंग्रजी असल्याने ते कायद्याच्या कक्षेबाहेर होते. त्यामुळे कारवाई करता येत नव्हती. नवा भारत मंत्री लॉर्ड क्रेनब्रुकने कायद्यावरील प्रसिद्धीपूर्व लिखाणाच्या कलमाला विरोध केला. त्यांच्यामते, तपासणीस भारतीय ठेवावे लागतील व त्यंना वृत्तापत्रांचे लिखाण पुन्हा करावे लागेल. म्हणूनच सप्टेंबर -१८७८ मध्ये संबंधित कलम रद्द करण्यात आले व त्याऐवजी एक वृत्तपत्र आयुक्त (Press Commissioner) नियुक्त करण्यात आला. त्याचे काम वृत्तपत्रांना अधिकृत व अचूक बातम्या पुरविण्याचे होते. भारतीय वृत्तपत्रासाठी अनिष्ठ ठरलेला १८७८ चा कायदा उदारमतवादी व्हाईसरॉय लिटनने १८८२ मध्ये रद्द केला.

१८९६-९७ च्या दुष्काळ व प्लेगमुळे दक्षिण भारतात असंतोष निर्माण होऊन हिंसक घटना घडू लागल्या. राजकीय वाद-विवादात वृत्तपत्रांनीही आपले योगदान दिले. परिणामी १८९८ च्या कायद्याव्दारे दंडसंहितेची कलम १२४ लागू करण्यात आले व त्याला १५३-अ हे नवे कलम जोडल्या गेले. तसेच कलम ५०५ संशोधीत करण्यात आले. जेणेकरून सैन्यात असंतोष निर्माण करण्यास कारणीभूत होणारे तसेच एखाद्या व्यक्तीला राज्यविरोधी कार्याची प्रेरणा देणारे वक्तव्य शिक्षेस पात्र ठरविण्यात आले.

**१९०८ चा कायदा :-**लॉर्ड कर्झनच्या धोरणामुळे निर्माण झालेल्या असंतोषाचा परिणाम म्हणजे काँग्रेसमध्ये जहालवादी गटाचा उदय. तसेच काही हिंसक घटना घडल्या. समकालीन वृत्तपत्रांनी सरकारला धारेवर धरले. हे वातावरण दडपता यावे यासाठीर सरकारने १९०८ मध्ये एक कायदा संमत केला. तो पुढीलप्रमाणे-

१. लोकांमध्ये हिंसक वातावरण व चिथावणी मिळेल अशा स्वरूपाचे लिखाण करणाऱ्या वृत्तपत्राची संपत्ती किंवा छापखाना जप्त केल्या जाऊ शकेल.

२. १८६७ च्या वृत्तपत्रे व पुस्तकाच्या पंजीकरण कायद्याअंतर्गत स्थानिक शासन व कोणत्याही मुद्राकाचे व प्रकाशकाचे प्रतिज्ञापत्र रद्द करू शकत होता.

३. वृत्तपत्राच्या मुद्रक व प्रकाशकांना छापखाना जप्त केल्यापासून १५ दिवसाच्या आत उच्च न्यायालयात अपील करण्याची परवानगी होती.

**भारतीय वृत्तपत्र कायदा १९१० :-**सरकारने १९१० मध्ये भारतीय वृत्तपत्र कायदा संमत केला. त्यामुळे लिटनच्या १८७८ च्या कायदासदृश परिस्थिती निर्माण झाली. या कायद्यानुसारस्थानिक शासन छापखान्याच्या मालकाला किंवावृत्तपत्राच्या प्रकाशकाला पंजीकरण जमानत मागू शकत असे. ही रक्कम ५००/- रूपये व जास्तीत जास्त २०००/- रूपये होती. तसेच सरकारला ही रक्कम जप्त करण्याचा वा पंजीकरण रद्द करण्याचा अधिकार होता. पून्हा नोंदणी करण्यासाठी सरकारला कमीत कमी १०००/- रूपये व जास्तीत जास्त १००००/- रूपये जमानत मागू शकत होती. नंतर वृत्तपत्राने आक्षेहार्य मजकूर प्रकाशित केला तर नवे पंजीकरण रद्द करण्याचा छापखाना व वृत्तपत्र व पुस्तकाच्या सर्व प्रती जप्त करण्याचा सरकारला अधिकार होता. जप्तीच्या आदेशाविरूद्ध संबंधित पक्ष दोन महिन्याच्या आत उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली असलेल्या विशेष न्यायाधिकरणाकडे अपील करू शकत होता. प्रत्येक प्रकाशकाला वृत्तपत्राच्या दोन प्रती विनामूल्य शासनाला दयाव्या लागत होत्या.वरील कायद्यानुसार ९९१ छापखाने व वृत्तपत्रांविरूद्ध कारवाई करण्यात आली. त्यापैकी २८६ प्रकरणात कडक चेतावनी देण्यात आली आणि ७०५ प्रकरणात मोठमोठ्या रक्कमा जमानत म्हणून घेण्यात आल्या. हा कायदा लागू होण्याच्या आधिच्या पाच वर्षात जवळपास पाच लक्ष रूपयाच्या जमानती जप्त करण्यात आल्या.

**भारतीय वृत्तपत्र कायदा १९३१ :-**२० व्या शतकाच्या चौथ्या दशकात राजकीय आंदोलन तीव्र बनू लागले. तसेच गांधींचे सविनय कायदेभंग आंदोलन सुरू झाल्यामुळे वृत्तपत्रांवन नियंत्रण आणण्याच्या उद्देशाने सरकारने १९३० मध्ये एक कायदा केला. त्यानुसार १९१० च्या कायद्यातील तरतूदी पुन्हा लागू करण्यात आल्या. १९३१ मध्ये सरकारने भारतीय वृत्तपत्र कायदा संमत केला. ज्याव्दारे सविनय कायदेभंगाच्या आंदोलनाचा प्रसार दडपून टाकण्यासाठी प्रांतीय सरकारला अतिरिक्त अधिकार देण्यात आले. १९३२ मध्ये या कायद्याला व्यापक बनवून अपराध संशोधीत कायदा (Criminal Amendment Act) लागू करण्यात आला. व्दितीय महायुद्धाच्या काळात भारत सुरक्षितता नियमाखाली पूर्व तपासणी पून्हा लागू करण्यात आली. वृत्तपत्र आणिबाणीकालीन कायदा व शासकीय गुप्ततेचा कायदा संशोधीत करण्यात आला व काही काळासाठी काँग्रेसबाबतची वृत्ते छापणे ही बेकायदेशीर करण्यात आली.

**वृत्तपत्र चौकशी समिती :-**मार्च १९४७ मध्ये सरकारने वृत्तपत्र चौकशी समिती नेमली व निर्देश दिला की समितीने संविधान सभेत (Constituent Assembly) स्पष्ट केलेल्या मुलभूत अधिकाराच्या संदर्भात वृत्तपत्र कायद्याची तपासणी करावी. समितीने केलेल्या शिफारशीमध्ये १९३१ चा कायदा रद्द करणे, वृत्तपत्र व पुस्तकाच्या कायद्यात संशोधन करणे, भारतीय दंड संहितेच्या (Indian Penal Code) कलम १२४-अ आणि १५३-अ मध्ये बदल करणे. १९३१ चा देशीय राज्य कायदा आणि १३४ चा देशी राज्य (संरक्षण) कायदा रद्द करणे ह्याचा समावेश होता.

**वृत्तपत्र (आक्षेपार्ह मजकूर) कायदा १९५१ :-** जानेवारी १९५० पासून नव्या घटनेची अंमलबजावणी सुरू झाली. १९५१ मध्ये सरकारला घटनेच्या अनुच्छेद १९(२) मध्ये संशोधन करण्याची व वृत्तपत्र कायदा संमत करण्याची गरज भासली. आजपर्यंतच्या कायद्यापेक्षा या कायद्याचे स्वरूप व्यापक होते. त्याव्दारे केंद्रिय व राजकीय वृत्तपत्र कायद्याचे अस्तित्त्व समाप्त झाले. नव्या कायद्याव्दारे वृत्तपत्रांनी व छापखान्यांनी आक्षेपार्ह्य मजकूर प्रकाशित केल्यास त्यांच्याकडून अमानत मागण्याचा वा जप्त करण्याचा अधिकार सरकारला मिळाला. हा कायदा १९५६ पर्यंत लागू होता.

**सारांश :-**वरील वृत्तपत्राचा इतिहास लक्षात घेता ब्रिटीश काळापासून स्वतंत्र भारताच्या काळापर्यंत वृत्तपत्रासंदर्भात अनेक कायदे अस्तित्त्वात आले. तसेच त्यासंदर्भात अनेक महत्त्वपूर्ण अधिकार सरकारने आपल्याजवळ ठेवले. वृत्तपत्रांची महत्त्वपूर्ण भूमिका म्हणजे वृत्तपत्रांमार्फत जनजागृती घडवून सर्वसामान्य जनतेमध्ये स्वातंत्र्याची मशाल पेटत राहिली.

**संदर्भसूची:-**
१. The Indian Press (१९४०) - Barns, Margarita
२. The Indian Press Year Book (Annual) - Gates, Reed
३. The News Paper in India - Ghose, H.P.
४. Report of the Press Commissions, ३ Parts (Published by Manager of Publication, New Delhi)